७१४
जा.क्र /कृ.आ./१४-१५/मार्गदर्शक सुचना/फलो-४/ /२०१४
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे , ४११ ००५,
दिनांक ५ /१२/२०१४.

प्रति,

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (विदर्भ वगळता सर्व)

विषय :- शेतावरील पाणी व्यवस्थापन उपअभियान
सन २०१४-१५ मधील प्रकरणांबाबत करावयाची कार्यवाही.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे जा.क्र/फलो-४/प्र.क्र १/शेपाव्य/मासु/५७३/२०१४ दि. १/१०/२०१४
२) या कार्यालयाचे जा.क्र/कृ.आ/१४-१५/आ.सु/फलो-४/७२५/२०१४ दि. २१/११/२०१४

उपरोक्त संदर्भ क्र १ अन्वये शेतावरील पाणी व्यवस्थापन या उपअभियानाच्या सन २०१४-१५ साठी मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

मा.अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांनी दि. १७/११/२०१४ रोजी दिलेल्या सुचनांप्रमाणे सन २०१४-१५ मधील दि. १/४/२०१४ पासून आजपर्यंत बसविलेल्या संचाना अनुदान अदा करण्यासाठी संदर्भ अ.२ अन्वये सुधारीत मार्गदर्शक सुचना निर्गमत करण्यात आलेल्या आहेत. याच अनुषंगाने मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांच्या दि.२/१२/२०१४ रोजीच्या आढावा बैठकीत सविस्तर चर्चा झालेली आहे. या चर्चेच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शीघ्र गतीने कार्यवाही होण्यासाठी खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दि. १/०४/२०१४ ते ३०/११/२०१४ पर्यंत बसलेल्या संचाची अनुदान प्रकरणे आवश्यक त्या कागदपत्रासह आठ दिवसाच्या आत सादर करण्याबाबत प्रसिध्दी द्यावी, जेणे करुन शेतकरी व वितरकांकडून प्रकरणे प्राप्त होतील
२) केवळ वितरक अथवा कंपनी यांच्यावर अवलंबून न राहता संच बसविलेल्या शेतकऱ्यांच्या याद्या व अनुषंगाने कागदपत्रे प्राप्त करुन घेण्यासाठी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी उपविभाग व तालुकास्तरावरील अधिकाऱ्यांना विशिष्ठ जबाबदारी निश्चित करुन द्यावी.
३) मंडल कृषि अधिकारी यांनी वितरकांकडून बिले प्राप्त करुन घ्यावीत आणि कृषि पर्यवेक्षक व कृषि सहाय्यकांनी वितरकांच्या मदतीने शेतकऱ्यांकडून आवश्यक त्या कागद पत्रांची उपलब्धता करुन घ्यावी.
४) तालुका कृषि अधिकारी यांनी शासकीय प्रयोगशाळाबरोबरच के.व्ही.के/कृषि विद्यापीठे आणि सहकारी संस्थाकडून माती व पाणी तपासणी करुन घेण्याचे नियोजन करावे.
५) बिले प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या दिनांकाच्या अनुक्रमाणे मोका तपासणीची कार्यवाही संदर्भ क्र २ मधील सुचना प्रमाणे करावी.

६) तालुका कृषि अधिकारी यांनी ठिबक सिंचन संचासाठी अनुदानाची निश्चिती करतांना या कार्यालयाने जा.क्र.कृ आ/फलो-४/शेपाव्य/मासु/६४३/२०१४ दि. ३०/१०/२०१४ प्रमाणे कळविलेल्या संच उभारणी खर्चावर न करता शासनाने दि.२९/११/२०१४ च्या शासननिर्णयान्वये (लॅटरल अंतराच्या गटनिहाय) निश्चित केलेल्या संच उभारणी खर्चावर अनुदानाची परीगणना करावी.

७) ज्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कोषागारातून केंद्र हिस्सा निधी आहंरीत केला आहे त्यांनी त्यांच्या स्तरावरुन दि.१५/१२/२०१४ पूर्वी शेतकऱ्यांच्या बॅंक खात्यावर RTGS द्वारे जमा करावा व

८) उपयोगिता प्रमाणपत्र तातडीने सादर करावे

९) ज्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी अद्यापही निधी कोषागारातून आहंरीत केला नाही त्यांनी तातडीने तो आहंरीत करुन दि.१५/१२/२०१४ पर्यंत संबंधित शेतकऱ्यांच्या बॅंक खात्यात तो RTGच द्वारे जमा करावा व त्या रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

१०) सद्यस्थितीत जिल्हयांना उपलब्ध निधीच्या (रु. ६२.५० कोटी) प्रमाणात लक्षांक दिला आहे. तथापि यापेक्षा जास्त संख्येने संच बसविले असल्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा अतिरिक्त प्रस्तावांची देखील सर्व कागदपत्रे प्राप्त करुन घेऊन त्यांची मोका तपासणी करुन घेऊन प्रकरणे अनुदान अदायगीसाठी सर्वार्थाने परिपूर्ण करुन ठेवावीत, जेणे करुन निधीचा पुढील हिस्सा प्राप्त होताच त्याचा विनियोग विनाविलंब होईल मात्र एकूण प्रकरणांची संख्या वार्षिक कृती आराखडयापेक्षा जास्त असणार नाहीत याची दक्षता जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घ्यावी.

उपरोक्त प्रमाणे तसेच मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) दि.२/१२/२०१४ रोजीच्या सभेत दिलेल्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही अत्यंत तातडीने करण्याची दक्षता घ्यावी.

मा.आयुक्त कृषि यांच्या मान्यतेने.
पुणे - ४११ ००५.

संचालक फलोत्पादन
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११००५.

प्रत :- मा. अपर मुख्य सचिव (कृषि व पणन) यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- मा.आयुक्त कृषि यांना माहितीस्तव सादर

प्रत :- विभागीय कृषि सहसंचालक (सर्व) यांना माहितीस्तव अग्रेषित

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर प्रकरणी वेळोवेळी आढावा घेऊन या कार्यक्रमाचे सनियंत्रण करावे.